Date: 25.10.2023 to 28.10.2023

**धुळे जिल्ह्यातील शेतकरी, युवकांसाठी कौशल्य विकास आधारित फळ छाटणी व रोपवाटिका प्रशिक्षण या विषयावर चार दिवसीय प्रशिक्षण संपन्न....**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ कृषि विज्ञान केंद्र, धुळे व आत्मा, कार्यालय धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने चार दिवसीय फळ छाटणी आणि रोपवाटिका प्रशिक्षण कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे नुकतेच पार पडले. प्रशिक्षणासाठी धुळे जिल्ह्यातील एकूण ३० शेतकरी उपस्थित होते.

उद्घाटन प्रासंगिक अध्यक्षीय मनोगत मध्ये डॉ चिंतामणी देवकर यांनी रोपवाटिके साठी लागवड माध्यम निर्जंतुकिकरन यावर भर दिला. ते म्हणाले की रोपांची पिशवीत असलेली माती ही रोग,कीड आणि सूत्रकृमी चा प्रादुर्भाव वाढवण्याचे एक माध्यम आहे. ते निर्जंतुक करून घेतल्यास हा प्रादुर्भाव आटोक्यात ठेवणे शक्य होते. व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. कुरबान तडवी, आत्मा प्रकल्प संचालक श्री. नवनाथ कोळपकर, उपसंचालक श्री. विनय बोरसे, डॉ. राहुल देसले, प्राचार्य घटक कृषि तंत्र विद्यालय,धुळे, डॉ दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, धुळे प्रशिक्षण समन्वयक श्री रोहित कडू उपस्थित होते.

सदर चार दिवसीय तांत्रिक चर्चा सत्रामध्ये श्री. रोहित कडु, विषय विशेषज्ञ(उद्यानविद्या), डॉ. दिनेश नांद्रे, कार्यक्रम समन्वयक, श्री. विनय बोरसे, उपसंचालक, आत्मा, धुळे, डॉ. अतिश पाटील, विषय विशेषज्ञ(मृदा शास्त्र व कृषि रसायन), डॉ. पंकज पाटील, विषय विशेषज्ञ(पिक संरक्षण) यांचे मार्गदर्शन लाभले यात प्रामुख्याने रोपवाटीकेसाठी जागेची निवड, आखणी, मातृ वृक्ष लागवड, संगोपन इ., लागवडीचे माध्यमे, अभिवृद्धी प्रकार (कलम व डोळा भरणे), साधने, निगा, वर्गीकरण, खत व्यवस्थापन व संजीवकांचा वापर इ., रोपवाटीकेसाठी विविध कायदे, अंबलबजावणी यंत्रणा आणि प्रासंगिक तक्रार निवारण प्रणाली, कृषि विभागाच्या रोपवाटीकेसाठी योजना, रोपवाटीकेसाठी विविध गृह, महत्व, आखणी व उभारणी, रोपवाटीकेमध्ये पोलिथिनचा, वापर, निर्जंतुकीकरण आणि पाणी देण्याच्या पद्धती इ., रोपवाटीकेतील मातीचे गुणधर्म, चुनखडी संवेदनशीलता, सेंद्रिय कर्बाचे महत्व इ., रोपवाटीकेतील एकात्मिक पिक संरक्षण, रसायनांचा वापर इ., फळ झाडांमध्ये छाटणीची गरज, महत्व, प्रकार, आणि छाटणीसाठीचे साधने, फळ झाडांचे फुल व फळधारणेचे प्रकार व हंगाम, फळ छाटणी व त्यानंतर फुल व फळ धारणेसाठी व्यवस्थापन, फळ वाढीच्या विविध अवस्थेतील निगा, खत, कीड आणि रोग व्यवस्थापन इत्यादी विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणाचे संचालन श्री. रोहित कडू यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.पंकज पाटील, यांनी मानले. चर्चा सत्र यशस्विते साठी, श्री.जगदीश काथेपुरी, कु.अमृता राऊत, डॉ.धनराज चौधरी ,डॉ.आतिश पाटील,श्री.जयराम गावित, कु.प्राची काळे, श्री.स्वप्नील महाजन, श्री.बाळू वाघ, श्री.कुमार भोये, श्री.रमेश शिंदे, श्री. मधुसूदन अहिरे इ. कृषि विज्ञान केद्र धुळे अधिकारी, कर्मचारी तसेच कृषि विभाग व आत्मा कार्यालय, धुळे यांचे सहकार्य लाभले.

भेटी आणि प्रात्यक्षिकांद्वारे प्रशिक्षण- सदर प्रशिक्षणा वेळी धुळे तालुक्यातील प्रगतशील रोपवाटिका; मे. कासूमाई, भारत आणि मॉडर्न रोपवाटिका यांना भेटी देण्यात आल्या. तसेच, कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर डाळिंब, लिंबू, आवळा, पेरू आणि सिताफळ झाडांची छाटणी प्रात्यक्षिक घेण्यात आले. समशीतोष्ण भागात यशस्वी टक्केवारी जास्त असणारे पाचर, भेट, गुटी दाब इ.कलम आणि डोळावृद्धीचे प्रकारांचे प्रात्यक्षिक उपस्थित प्रशिक्षणार्थींना दाखविण्यात आले.



उद्घाटन प्रसंगि अध्यक्ष डॉ चिंतामणी देवकर व्यासपीठावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री कुर्बान तडवी, आत्मा प्रकल्प संचालक श्री कोळपकर,उपसंचालक श्री बोरसे , डॉ राहुल देसले, डॉ दिनेश नांद्रे, प्रशिक्षण समन्वयक श्री रोहित कडू उपस्थित होते



कासुमताई रोपवाटिका फागणे ता.जिल्हा धुळे येथे प्रशिक्षणार्थी यांची भेटी प्रसंगि मालक श्री चौधरी, श्री कडू सर व उपस्थित प्रशिक्षणार्थी